**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**

| VOL- VIII | ISSUE- VII | JULY | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांचे योगदान : एक अभ्यास

डॉ. कैलास सर्जेराव मोटे
प्र. प्राचार्य
एसएसजेपी बी.एड/एम.एड. कॉलेज, आळणी–उस्मानाबाद

प्रस्तावना :

अधिकाराच्या व सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार नागरी पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या स्थानिक पातळीवरील लोकनियुक्त संस्था ग्रामीण व शहरी स्तरांवरील स्वशासनाचा कारभार करणाऱ्या व्यवस्थेला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणतात. प्रदेशपरत्वे त्यांच्या अधिकारांच्या नावात व कर्तव्यांत फरक आढळतो आणि देशपरत्वे त्यांची नावेही निरनिराळी आढळतात. जागतिक स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था ही संकल्पना इ. स. पू. काळापासून अस्थित्वात होती. त्याचे दाखले ग्रीक नगरराज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उल्लेखातून मिळतात. किंबहूंना स्वराज्य संस्थांमुळेच लोकशाही यशस्वी अस्तीत्वात आली असे म्हणता येईल. लोकशाहीत लोकांनी लोकांसाठी लोकांकडून लोकांच्या कल्याणासाठी कारभार केला जातो. गाव पातळीवर गावाचा विकास व समाज व्यवस्था एकसंघ टिकवून ठेवण्याचे काम महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायती मार्फत केले जाते.

जगातील बहुतांश देशात स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत आहेत. त्याचे स्वरूप व रचना मात्र देशपरत्वे वेगवेगळी आहे. जगामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फतच ग्रामीण भागातील राज्यकारभार चालवला जातो. गाव पातळीवर सत्तेच्या विकेंद्रकरणाच्या माध्यमातूनच विकास कार्य पोहचवण्याचे कार्य केले जाते. मात्र अलिकडच्या काळामध्ये शहरी विकासाला अधिक प्राधान्य देण्यात येऊ लागले आहे. शहरी भागाच्या विकासात गावचा विकास संबंधित केंद्र व राज्य स्तरावरील शासन यंत्रणा विसरत जातांना दिसत आहे. ग्रामीण समाज व्यवस्था व अर्थ व्यवस्था जेव्हा सुधारेल तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होणार आहे. यासाठी शासन यंत्रणांनी ग्रामीण भागाच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. औद्योगिक क्राती झाली म्हणजे देशाचा विकास झाला असे नव्हे. तर कारखाण्यांना आवश्यक असणारा कच्चामाल तर ग्रामीण भागामध्येच उत्पादीत होतो त्यामुळे कच्चा माल निर्मितीसाठी ग्रामीण जनतेला विशेष सहाय्य करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर ग्रामीण जनतेचे जीवनमान सुधारण्यासाठीही प्रयत्न करणे गरजेचे आहे.

भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. येथे अनेक राजकीय स्थित्यंतरे होऊनही त्यांचे अस्तित्व हजारो वर्षे टिकून आहे. खेडी आत्मनिर्भर व समृध्द बनविण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्वपूर्ण आहे. या संस्थांनी राजकीय शिक्षणाव्दारे लोकांच्या राजकीय जाणिवा जागृती व सहभागातून नेतृत्वनिर्मितीची प्रकिया गतिमान केली आहे. पायाभूत सुविधांच्या विकासापासून लोककल्याणकारी कार्ये पार पाडून लोकशाहीच्या यशस्वी संवर्धनाची महत्त्वाची कामगिरी त्या बजावत आहेत. ऐतिहासिक दृष्टया स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थूलमानाने तीन कालखंड पडतात एक प्राचीन अथवा ब्रिटीश अंमलपूर्व काळ दोन अव्वल इंग्रजी अंमल आणि तीन स्वातंत्र्योत्तर काळ होय. या प्रत्येक कालखंडात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रचना व अधिकारामध्ये बदल झालेला दिसून येतो.

ब्रिटिश पूर्व काळ :

भारतात प्राचीन काळापासून ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन गावातील समस्यांवर विचार विनिमय करीत. त्यासाठी गावातील प्रौढ नागरिकांची सभा बोलावली जात असे. तिला ग्रामसभा म्हणत, वैदिक काळातील

ग्रामसभेचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. ही ग्रामसभा मर्यादित लोकांच्या समित्या नेमत असे. या समित्यांच्या माध्यमातून पुढे गावातील पाच लोकांची पंचायत अस्तित्वात आली. पुढे पंचायतीचे रूपांतर ग्रामपंचायतीमध्ये झाले. तिची संरचना गावातील ग्रामस्थांच्या गरजेतून झाली होती. महाभारतातील सभापर्व, जातक कथा, कौटिल्य यांच्या अर्थशास्त्रात ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. यावरून ग्रामस्तरावर स्थानिक संस्था अस्तित्वात होत्या, सभा, ग्रामणी, ग्रामवृध्द या संज्ञांनी त्यांचा उल्लेख केलेला आढळतो. पुढे श्रेणी, जाती, कुल, गण इ. संस्थांना महत्त्व प्राप्त झाले. मात्र ग्रामीणचे महत्त्व वाढत गेलेले आपणास दिसून येते. पूर्वी गाव पातळीवर जात पंचायती असत. या जात पंचायती समाज व्यवस्था टिकवून ठेवण्याचे कार्य करत असत. तसेच गावातील पाटील, कुलकर्णी देशमुख इ. च्या माध्यमातून गावाच्या विकासासंदर्भात निर्णय घेतले जात असत

ब्रिटीश अंमलाचा काळ :

ब्रिटीश काळात स्थानिक स्वराज्य संस्थेत आमुलाग्र बदल झाला आणि अव्वल इंग्रजी अमदानित (1858–1947) विद्यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला. त्यामुळे ग्रामीण व शहरी जीवनात लक्षणीय बदल झाले. तत्कालिन ब्रिटीश शासनाने प्रथम 1850 च्या कायदयाने ग्रामपंचायती पेक्षा मोठया शहरातून नगरपालिका स्थापन करण्याचा हक्क त्या त्या नगरातील लोकांना दिला. त्यानुसार स्थानिक संस्थांची निर्मिती झाली. या कायदयानुसार महाराष्ट्रातील सातारा, वाई, आदी शहरामधून नगरपालिका स्थापन झाल्या. त्यामुळे शासन व नागरी जनता यात प्रत्यक्ष संपर्क सुरू झाला. पुढे व्हाईसरॉय लॉर्ड जॉन रिपन – (1880 – 1884) याने 1882 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित स्वरूपात स्वायत्तता दिली. जिल्हा लोकल बोर्ड सुरू करून खेडयापर्यंत स्थानिक स्वराज्याची कल्पना प्रसृत केली. 1907 मध्ये रॉयल कमिशन ऑन डिसेंट्रलायझेशन नेमण्यात आले. या आयोगाने ग्रामपंचायती मजबूत करण्याची शिफारस केली. त्यानुसार पाच पंच असावेत व त्यांची अनौपचारिक पध्दतीने निवड करावी आणि गावाचा पाटील हा सरपंच असावा. अशी शिफारस केली. या शिफारशींना अनुसरून भारत सरकारने 1915–1918 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक एक ठराव संमत केला. याशिवाय मॉटेंग्यू चेम्सफर्ड अहवालानुसार काही सूचना या संदर्भात देण्यात आल्या त्याला अनुसरून काही प्रांतातून व संस्थांनातून स्थानिक संस्थांच्या बाबीत कायदे झाले. 1919 च्या भारत सरकारच्या कायदयाने स्थानिक स्वराज्य संस्थांचा टप्पा टप्प्याने विकास घडवून आणण्याचे धोरण जाहीर झाले. त्यानुसार सर्व प्रांतामध्ये ग्रामपंचायत, जिल्हा बोर्ड, नगरपालिका यांसारख्या स्थानिक संस्था स्थापन झाल्या. लोकनिर्वाचित मंत्र्याकडे हा विषय सोपविल्यामुळे प्रौढ मतादवारे सभासद संस्थांचे सभासद निवडले गेले. तसेच मुंबई ग्रामपंचायत 1920 कायदयाने मुंबई इलाख्यात ग्रामपंचायतीची स्थापना झाली. गावातील पाटील किंवा इनामदार हा पदसिध्द सभासद वगळता इतर सभासद प्रौढ मताद्वारे निवडले जात होते.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतरचा स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास :

भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. या संकल्पनेत केद शासन, राज्यशासन आणि ग्रामपंचायती पासून महानगरा पर्यंतच्या स्थानिक शासन संस्था अशी त्रिस्तरीय राज्य कारभाराची व्यवस्था अभिप्रेत होती. त्या दृष्टिकोणातून तळागाळातील स्थानिक संस्थांना स्वायत्तता व स्वातंत्र्य देण्यात आले. त्याला अनुसरून 1947 मध्ये ग्रामपंचायतींचे पुनरूज्जीवन करण्यात आले. महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचा पुरस्कार करण्यात आला. यासाठी गाव तिथे ग्रामपंचायत या तत्त्वांचा स्विकार करण्यात आला. संविधानाच्या चौथ्या भागातील चाळीसाव्या अनुच्छेदात तद विषयी मार्गदर्शक तत्त्वे अंतर्भूत करण्यात आली आहेत. काटजू समितीने 1954 मध्ये या बाबतीत अनेक शिफारशी केल्या. विकास कार्यक्रमात स्थानिक स्वराज्य संस्थाना कोणते स्थान असावे याचा विचार करण्यासाठी नॅशनल डिव्हेलपमेंट काऊन्सिलची स्थापना बलवंतराय मेहतांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली 1955 मेहता समितीने तीन स्तरांच्या स्थानिक स्वराज्याची कल्पना मांडली आणि ग्रामपंचायत तालुका पंचायत व जिल्हा परिषद याकडे अधिकार विषयक अनेक शिफारशी केल्या, त्यानुसार लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार पंचायत राज्य संस्थांची 1957 मध्ये स्थापना झाली. पंचायत राज्य हा

विषय राज्यसूचीत समाविष्ट करण्यात आला आणि घटक राज्यांनी आपल्या सोयीनुसार पंचायत राज्याची निर्मिती केली. महाराष्ट्र प्रदेशपरत्वे ब्रिटिश काळापासून वेगवेगळे कायदे होते. बॉम्बे व्हिलेज पंचायत ॲक्ट 1933 हा पश्चिम महाराष्ट्रात लागू होता. तर विदर्भात जनपद कायदा अणि मराठवाडयात 1949 नंतरचा ग्रामपंचायत कायदा लागू होता. या सर्वांचा विचार वंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने करून जिल्हा परिषदांच्या निर्मितीस मान्यता दिली 1958 पुढे 1965 च्या कायदयाने यातील काही तांत्रिक बदलांना अनुमती दिली व ते सुधारले. निवडून आलेल्या सदस्यांतून सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष, महापौर, उपमहापौर इत्यादींची निवड करण्याची पध्दत रूढ झाली. पुढे काही बदल करून स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एकसूत्रीकरण निर्माण करून पंचायत संस्थांचे पुनरूज्जीवन करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने 1986 मध्ये डॉ. एल.एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीने या संस्थांना घटनात्मक संरक्षण देण्याची शिफारस केली. या समितीच्या शिफारशीवरून चौंसष्टावे पंचायत राज्य घटना दुरूस्ती विधेयक चर्चेस येऊन संसंदेने ते 10 ऑगस्ट 1989 रोजी संमत केले पण राज्यसभेने ते फेटाळले. अखेर पी. व्ही नरसिंगरावांच्या कारकिर्दीत ते अंतिम स्वरूपात 23 डिसेंबर 1992 रोजी संमत झाले. त्यानंतर त्र्याहत्तराव्या घटना दुरूस्तीने यात घटक राज्यांची संमती घेण्यात येऊन 24 एप्रिल 1993 रोजी या कायदयाची अंमलबजावणी झाली. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षण देण्यात आले.

स्वातंत्र्य पूर्व काळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळाचा सुरूवातीचा कालखंड व आजच्या 21 व्या शतकाचा विचार केला तर असे लक्षात येते की, विविध टप्यावर राजकीय व सामाजिक स्थित्यंतरे झाली परंतू आजही ग्रामीण व आदिवाशी समाज विकासापासून खूप दूर आहे. आदिवाशी समाजामध्ये संविधानाची बिजे आजूनही रूजलेली नाहीत. आजही जातीय पंचायती कार्यरत आहेत. या जात पंचायती अंधश्रध्दा उराशी बाळगून सामाजिक जीवन जगत आहेत. आजही विविध धर्माचे व जातीचे वेग वेगळे कायदे 21 व्या शतकात अस्तित्वात आहेत. हे कायदे गावातच नाहीत तर शहरातील अविकसित भागामध्येही अस्तित्त्वात आहेत. यामुळे घटनेच्या न्याय्य तत्त्वानुसार न्याय देणे शक्य होत. त्यामुळे न्याय व्यवस्थे संमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. धार्मिक व जातीय समीकरणाचा आधार घेतला तर एकाच प्रकरणात दोन प्रकारचे न्यायदान होऊ लागले आहे. त्यामुळे समान नागरी कायदयाचा विचार होणे गरजेचे आहे. 21 व्या शतकात स्थानिक स्वराज्य संस्था गाव पातळीवर असल्या तरी जात पंचायतीही कार्यरत आहेत. स्वातंत्र्य मिळूण 70 वर्षे पूर्ण झाली परंतू ग्रामीण भाग आज ही विकासापासून वंचित आहे. गांधीजींचे स्पष्ट मत होते की खेडयाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. आज खरोखरच खेडी विकासापासून खूप दूर आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्य :

स्थानिक स्वराज्य संस्थेचे तीन स्तर आहेत. ज्यामध्ये गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती तर जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदेचा समावेश होतो. या तीनही यंत्रणांचे अधिकार क्षेत्र वेगवेगळे असले तरी ग्रामीण भागाचा विकास करणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेचे मुख्य कार्य आहे.

ग्रामपंचायत : गाव पातळीवर गावाच्या विकासासाठी ग्रामपंचायत काम करते. ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, व इतर सदस्य यांची निवड लोकशाही पध्दतीने गुप्त मतदानाच्या पध्दतीने होते. या प्रत्येक सदस्याची जबाबदारी ही गावाचा सर्वांगीन विकास करणे ही असते. ज्यामध्ये पाणीपुरवठा, दिवाबत्ती, गावाची स्वच्छता, रस्ते, नाल्या यांची दूरूस्ती व देखभाल, आरोग्य, प्राथमिक शिक्षण, जन्म–मृत्यूच्या नोंदी तेसेच गावात सुव्यवस्था टिकवून ठेवण्याचे काम ग्रामपंचायतीला करावे लागते.

पंचायत समिती : पंचायत समित्यांचे काम उपसमित्यांतून चालते, उत्पादन योजना, समाजकल्याण, सहकार, कुटिरोद्योग, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, सफाई, दळणवळण, या विषयीची कामे करणे. जिल्हा परिषदा किंवा शासन यांनी सोपविलेली कामे करण्याची जबाबदारी पंचायत समितीचे असते.

जिल्हा परिषद : जिल्हा परिषदेची कामे म्हणजे अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा चालविणे, त्यावर देखरेख ठेवणे, आरोग्यकेंद्रे व दवाखाने, रस्ते व उद्याने, पाणीपुरवठा, लघु–जलसिंचन योजना, ग्रामीण घरबांधणी, समाजकल्याण, खत वाटप, कृषिविद्यालये, गटार योजना, बांधकाम, कृषि

सल्ला इत्यादी कामे जिल्हा परिषदेला करावी लागतात. जिल्हयातील विकास कामांचा आराखडा तयार करून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्थांना करावे लागते.

आज स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणाचे स्वरूप बदलू लागल्याने धार्मिक व जातीय समीकरणे पुन्हा एकदा अधिक बळकट होत आहेत. जातीय समीकरणे अधिक बळकट होत असल्याने ग्रामीण भागाच्या विकासावर या राजकारणाचा खूप मोठा परिणाम होत अल्याचे दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेतून ग्रामीण भागाच्या विकासाला गती ज्या प्रमाणात मिळणे अपेक्षीत होते, तेवढया प्रमाणात गती मिळालेली नाही. ग्रामीण भाग आजही शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ता या मूलभूत सुविधापासून वंचित आहे. याला उस्मानाबाद जिल्हा आपवाद नाही. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकास कार्याचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हा विकासापासून कोसोदूर आहे. उस्मानाबाद जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे ग्रामीण भागाचा विकास किती व कसा झाला. तसेच ग्रामीण भागाच्या विकासावर स्थानिक राजकारणाचा काय परिणाम झाला. याचा विचार करण्याच्या दृष्टीने संशोधकाने प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

संशोधनाची गरज :

1. उस्मानाबाद जिल्हयाच्या ग्रामीण भागाच्या विकासासंदर्भात अनेक प्रश्न अनुत्तरीत असल्याने प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची संशोधकाला गरज भासली.
2. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेमुळे कोण कोणते सामाजिक बदल ग्रामीण भागामध्ये झाले व कोणते बदल होणे अपेक्षीत होते याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे.
3. उस्मानाबाद जिल्हयाच्या ग्रामीण भागाच्या राजकारणाचे स्वरूप वेग वेगळया टप्प्यावर कसे बदलत गेले याचा विचार करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाची गरज आहे.
4. ग्रामीण समूह हा शहरी भागापासून अलिप्त असा भाग आहे. या भागात शहरी भागाप्रमाणे विकास झालेला नाही. शहरातील लोक ज्या प्रमाणे विविध कर भरतात त्या प्रमाणे ग्रामीण भागातील नागरीकही विविध कर भरतात. परंतू ग्रामीण भागाचा विकास शहरी भागाप्रमाणे का झाला नाही ? या गोष्टीचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाची गरज आहे.
5. उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागात मागील 20 वर्षाच्या कालखंडात झालेल्या विविध विकास कामांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाची गरज आहे.
6. उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण लोकजीवनाची सद्यस्थिती त्यांचे दैनंदिन व्यवहार, रोजगार, शिक्षण यांच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तूत संशोधनाच्या अभ्यासाची गरज आहे.
7. उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या कार्यपध्दतीचा व त्या कार्यपध्दती विषयी लोंकांचे मत जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची गरज आहे.
8. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्थापनेमुळे गाव व गावाच्या राजकारणावर तसेच विकासावर कोणता परिणाम झाला. याचा आभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाची गरज आहे.

संशोधनाचे महत्त्व :

1. उस्मानाबाद जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापनेपासून उस्मानाबाद जिल्हयाच्या राजकारणात कोणकोणते बदल झाले आहेत व त्या बदलाचा उस्मानाबाद जिल्हयाच्या विकासावर काय परिणाम झाला आहे व भविष्यात कोणते परिणाम होण्याची शक्यता आहे. याचा विचार करण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.
2. ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाचे महत्त्व आहे.
3. स्थानिक स्वराज्य संस्थेची ग्रामीण भागाच्या विकासात कोणती भूमीका आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाचे महत्त्व आहे.
4. ग्रामीण भागातील प्रश्न जाणून घेऊन ते प्रश्न सोडवण्यासाठी संबंधित यंत्रणांना माहिती करून

देण्याच्या दृष्टीने सोडविण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधानाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.

5. स्थानिक राजकारण वैयक्तिक पातळीवर आले तर कोण कोणते परिणाम होतात याची माहिती करून घेण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.
6. ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पाणी या सारखे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाचे महत्त्व आहे.
7. ग्रामीण भागाच्या विकासातील अडचणी किंवा अडथळे जाणून घेऊन ते नागरिका पर्यंत व शासन दरबारी पोहचवण्याच्या दृष्टीने प्रस्तूत संशोधनाच्या अभ्यासाचे महत्त्व आहे.
8. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर थांबवून ग्रामजीवन उंचावण्यासाठी ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कशा निर्माण होऊ शकतात व या संधी निर्माण करून देण्यासाठी राजकिय नेत्यांची भूमिका किती व कशी महत्वाची आहे हे नागरिकांना माहित करून देण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व आहे.

संशोधनाची उद्दिष्टये :

1. जिल्हयातील ग्रामीण भागाच्या विकासात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या योगादानाचा अभ्यास करणे.
2. जिल्हयातील ग्रामीण भागात सद्यस्थितीत असणाऱ्या विविध समस्यांची माहिती घेणे.
3. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेबाबत लोकांची मत मतांतरे जाणून घेणे.
4. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेचे यश अपयशाचा अभ्यास करणे.
5. ग्रामीण भागातील लोकांचा राजकारणाविषयीच्या दृष्टीकोणाचा अभ्यास करणे.
6. ग्रामीण भागातील विविध समस्या सोडवण्यासाठी उपाय सूचविणे.

संशोधनाची गृहितके :

1. उस्मानाबाद जिल्हयाच्या विकासासाठी राजकिय दूरदृष्टी व इच्छा शक्तीचा अभाव.
2. उस्मानाबाद जिल्हयाच्या राजकारणात प्रभावी विरोधी पक्षाचा अभाव दिसून येतो.
3. ग्रामीण विकासावर होणारा अयोग्य आर्थिक विनियोग, तसेच निकृष्ट दर्जाची होणारी कामे.
4. ग्रामीण भागातील आजही पिण्याच्या पाण्याच्या व रस्त्यांच्या समस्या सूटलेल्या नाही.
5. ग्रामीण भागातील लोकांना स्वतः चे हक्का विषयी असणारी उदासिनता किंवा अज्ञान.
6. त्रिस्तरीय पंचायत राज व्यव्यस्थेने सत्तेचे विकेंद्रीकरण झाले खरे परंतू विकास मात्र झाला नाही.
9. आज ही ग्रामीण भागात आरोग्य व दिवाबत्तीच्या सुविधा उपलब्ध नाहीत.
10. शेतीसाठी 24 तास लाईट नाही तसेच शेतीसाठी पाण्याची कायमस्वरूपी सोय नाही.

जनसंख्या व न्यादर्श :

1. प्रस्तुत संशोधनामध्ये उस्मानाबाद जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींचा समावेश होतो.
2. उस्मानाबाद जिल्हयातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनसंख्येत समावेश होतो.
3. उस्मानाबाद जिल्हयातील सर्व नागरिकांचा जनसंख्येत समावेश होतो.
4. जिल्हयातील सर्व पंचायत समित्यांचा जनसंख्येत समावेश होतो.
5. प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण भागच्या संपूर्ण विकास कार्याचा समावेश होतो.

न्यादर्श :

1. उस्मानाबाद जिल्हयातील एकूण तालुक्यापैकी 50 टक्के तालुक्यांचा म्हणजे 4 तालुक्यांची न्यादर्श म्हणून लॉटरी पध्दतीने निवड करण्यात आली आहे.
2. निवड केलेल्या तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील 10 गावांचा म्हणजे एकूण 40 गावांचा न्यादर्शमध्ये समावेश करण्यात आला आहे. ही निवड सहहेतूक पध्दतीने करण्यात आली आहे.
3. जिल्हयातील निवड केलेल्या गावातील ग्रामपातळीवर कार्यकरणाऱ्या विविध राजकीय पक्षाच्या प्रत्येकी एका कार्यकर्त्याची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

4. निवड केलेल्या गावातील एकूण 40 गावातील प्रत्येक गावातील दोन नागरिकांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली आहे.
5. मागील 2000 ते 2020 या कालखंडातील विकास कामांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

संशोधनाची पध्दती :

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे. सर्वेक्षणाच्या माध्यमातून संशोधकाने 2000 ते 2020 पासूनच्या स्थानिक स्वराज्य संस्थेने केलेल्या विकास कामांचा अभ्यास करण्यात आला. तसेच प्रत्यक्ष स्थानिक पातळीवरील राजकिय नेते, नागरिक व अधिकारी यांच्याशी संपर्क साधून माहिती प्राप्त करण्यात आली.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखत व पडताळा सूची या साधनांचा वापर करून माहिती संकलित केली आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासांती प्राप्त निष्कर्ष :

1. उस्मानाबाद जिल्हयातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मागील 20 वर्षा पासून कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाची सत्ता होती.
2. उस्मानाबाद जिल्हयाचे राजकारण विशिष्ट घराण्यापूरते मर्यादित होते. त्यांच्या निर्णयाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांचे राजकारण करणेही शक्य नव्हते.
3. ग्रामीण भागात राजकिंय समिकरणे वैयक्तीक पातळीवर आल्याने व्देश व मत्सराची भावना वाढीस लागली. त्यामुळे विकास हा विषय बाजूला राहिला.
4. जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या तिन्ही स्तरावर वेग वेगळया पक्षाची सत्ता असल्याने ग्रामीण विकासात अडथळे निर्माण होतात.
5. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थामुळे विकासाच्या गती मंदावतांत. याचे कारण म्हणजे तीन टप्पावरून विकास कामांना मंजूरी घेऊन त्या कामाला अंतीम स्वरूप वेळेत देणे शक्य होत नाही.
6. बहुतांश गावामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आाज ही कायम आहे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ग्रामपंचायतीने कायमस्वरूपी केलेली नाही. त्यामुळे सर्व ऋतूमध्ये दुष्काळी परिस्थिती असते.
7. बहुतांश गावातील रस्ते, नाल्याचा प्रश्न आजही कायम आहे. गावात पक्के रस्ते व नाल्या नाहीत.
8. बहुतांश ग्रामीण भागामध्ये घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन, नालीसफाई यांचा प्रश्न कायम आहे.
9. प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाकडे कोणत्याही राजकीय पक्षाचे लक्ष नाही. गावातील एकाही राजकीय पक्षाच्या नेत्यांची मुले गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत नाही.
10. बहुतांश शाळा या एक शिक्षकी आहेत. त्यामुळे दर्जेदार प्राथमिक शिक्षणाचा अभाव आहे.
11. ग्रामस्तरावर तंटामुक्त समितीची स्थापना केली खरी परंतू या तंटामुक्त समितीला राजकिय स्वरूप प्राप्त झाल्याने गावातील तंटे कमी होण्याऐवजी वाढतच आहेत.
12. ग्रामीण भागात आजही पुरेशा वैद्यकिय सुविधा उपलब्ध नाहीत. बहुतांश गावामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रही नाहीत. ज्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे तेथे डॉक्टर उपलब्ध नाहीत.
13. शेतीमाल ग्रामीण भागात पिकवला जातो परंतू त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागामध्ये नाहीत.
14. बहुतांश ग्रामस्थांच्या मते शेतीसाठी पाण्याची सुविधा नाही. त्यामुळे हंगामी पिके घ्यावी लागतात.
15. बहुतांश लोकांच्या मते स्थानिक राजकारण हे विकासाभिमूख असावे तसेच ते वैचारिक असावे ते वैयक्तीक पातळीवर येणार नाही यासाठी प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.
16. बहुतांश गावामध्ये लाईटचा प्रश्न आहे 10 ते 15 तास लाईट नसते.
17. ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी ग्रामपंचायतींनी पाठपूरावा करून उपलब्ध निधीचा सुयोग्य वापर करावा असे बहुतांश नागरींकांचे मत आहे.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रमुख शिफारशी :–

1. राजकारण बाजूला ठेवून गावच्या विकासासाठी सर्व पक्षाच्या नेत्यांनी कार्यकरणे गरजेचे आहे.
2. त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील तालुका स्तरावरील स्तर कमी केला तर कामाला गती मिळेल.
3. ग्रामीण रोजगाराला चालणादेण्यासाठी गाव पातळीवर कृषि प्रक्रिया उद्योग तसेच कुटीरोद्योगांना चालणादेण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत.
4. ग्रामीण जागकारणात दर 5 वर्षाला सत्तांतर झाले तर विकासाला चालना मिळू शकते.
5. गावातील नागरिकांनी आपल्या हक्क व कर्तव्या विषयी जागरूक असणे गरजेचे आहे. गावाच्या विकासासाठी नेते व अधिकारी यांना वेळोवेळी प्रश्न विचारायला हवेत.
6. ग्रामीण जनतेने विकास करणाऱ्या प्रमाणिक व दूरदृष्टी असणाऱ्या नेत्यांच्या हाती गावचा कारभार सोपवावा.
7. बचतगटामार्फत चालणाऱ्या रोजगारांना बाजारपेठ उपलब्ध करून दयावी.
8. गावातील पिण्याचे पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण इत्यादीचे प्रश्न कायम स्वरूपी सोडवावेत.
9. गावातील जनतेच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी विकास आराखडा तयार करावा.
10. शेतीसाठी कायमस्वरूपी वीज व पाण्याची सुविधा उपलब्ध करून दयावी.
11. शेतमाल विक्रीसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दयावी किंवा शेतमाल निर्यातीसाठी प्रयत्न करावेत

संदर्भ ग्रंथसूची :–

1- भणगे, रविंद्र पांडूरंग, (2012), भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे,
2 वराडकर र.घ., (17 जुलै 2021),महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, पुणे, निराली प्रकाशन.
3 Mookerjee, Radhakumud, (1920), Local Government in Ancient India, Oxford,
4. Taylor, C. C.( 965), Indies Roots of Democracy, Bombay, 1
5. Goverment of Maharashtra Comp (1961.) Report of the Committee on Democratic Decentralisation, Bombay,
6. https://mr.vikaspedia.in/education/childrens-corner.